# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी १८ ते २४ जुलै २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| | १८ ते २४ जुलै मधील पाऊस (मि.मी मध्ये) | | | | | | | | | | | | | | सल्ला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष झालेला पाऊस | | | | | | | | | भारतीय हवामानखात्याने वर्तविलेला पावसाचा अंदाज | | | | | |
| दिनांक | जुलै ७—१३ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | |
| महाराष्ट्र | | | | | | | | | | | | | | | |
| धुळे | ७७.१ | १३ | २ | ०.२ | ०.३ | ०.२ | ० | ०.२ | ५.६ | ८ | ८० | ९९ | १६ | १८ | महाराष्ट्रात आतापर्यंत चांगला पाऊस झालेला आहे. तसेच खरीप हंगामातही चांगल्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील पिकांची जर खतांच्या आणि किडींच्या व्यवस्थापनाची नाट काळजी घेतली तर या वर्षी कापसाचे भरपूर उत्पन्न होण्याचा अंदाज आहे. चांगले पिरणाम दिसण्यासाठी स्फुरद आणि पालाश याची पूर्ण मात्रा तर नत्राची $^{१}/_{३}$ मात्रा पेरणीच्या वेळी देण्यात यावी. त्यानंतर युरियाची मात्रा ३ टप्यात २० ते २५ दिवसाच्या फरकाच्या अंतराने फुलोऱ्यावस्थेत आणि बोंडावस्थेत देण्यात यावी. खतांची मात्र देताना जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असावा याची खात्री करून घ्यावी. जरी मराठवाडयात १७—२० जूनला पाऊस झाला असला तरी महाराष्ट्रात पावसाला सुरूवात २३ जूनला झाली आहे. सर्वत्र २० दिवसात समान पावसाचे वितरण झाले आहे. २६ जूनच्या अगोदर पेरणी झालेल्या कापसाला अधिक फायदा झाला आहे. तथापि २५ जूनपर्यंत २.३५ लाख हेक्टर क्षेत्रात कापसाची पेरणी झाली आहे. अशा प्रकारे आतापर्यंत ३३ ते ३५ लाख हेक्टर क्षेत्रात महाराष्ट्रामध्ये पेरणी झाली आहे. २ जुलै पर्यंत १५ लाख हेक्टर आणि ९ जुलैपर्यंत २७ लाख हेक्टर क्षेत्रात कापसाची पेरणी पूर्ण झाली आहे. राज्यात सर्वत्र चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केल्यामुळे कापसाचे चांगले उत्पादन होण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणी कापसाची पेरणी १५ जुलै नंतर झाली असेल त्याठिकाणचे पीकांची वाढ नीट होणार नाही आणि उत्पादन ही कमी होईल. |
| नंदुरबार | ११४ | | ८.६ | ६.३ | १.३ | ०.४ | २.७ | १.६ | ७.३ | १६ | ९१ | ८८ | २८ | ३३ | |
| जळगांव | १३३ | ४४ | ४.९ | १.२ | ४.२ | १.९ | ०.१ | २.२ | १६ | ९ | ९१ | ८९ | १२ | १८ | |
| अहमदनगर | ५२.४ | | २.५ | १.५ | ०.६ | ० | ० | ० | ०.८ | २० | ९५ | ७२ | ७० | २५ | |
| औरंगाबाद | ११२ | २१ | १.९ | ०.४ | ० | ० | ० | ०.२ | ३.९ | १२ | ९० | ९० | ९ | ९ | |
| जालना | ११५ | ३५ | २.५ | ० | ० | ०.२ | ० | ० | १.५ | ० | ४३ | ४४ | ७ | ४ | |
| बीड | २४.२ | ३.७ | १.८ | १.१ | ०.९ | ० | ० | ० | १० | ० | ४५ | ४४ | ३ | ७ | |
| नांदेड | १७१ | ८७ | ६.५ | १.३ | ० | ० | १.७ | ६ | १.५ | ३ | ७५ | ८१ | ४ | ११ | |
| परभणी | १०८ | ५३ | १.६ | ० | ० | ० | ० | ५ | १.६ | ० | ७४ | ८५ | ६ | ८ | |
| हिंगोली | १२० | | १.३ | ० | ० | ० | ०.३ | ५.५ | ० | ० | ७४ | ७३ | ४ | ६ | |
| बुलढाणा | १५९ | ७९ | ६.३ | ० | ०.१ | ०.१ | ०.५ | २.४ | ८.२ | ३ | ५ | ३ | ६ | २ | |
| अकोला | २०१ | ९१ | ९.९ | १.७ | ३.१ | ०.९ | ३.१ | १.१ | ७.४ | २ | ४ | ४ | ३ | १ | |
| वाशिम | १२८ | ६३ | ३.२ | १.१ | १ | ०.४ | २.३ | ११ | ६.५ | १ | २ | ४ | ३ | १ | |
| अमरावती | १९६ | ३७ | २० | ०.३ | ०.१ | २.६ | १.८ | २ | १० | ४ | ४ | १० | ४ | १ | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९० | ५१ | ११ | ०.३ | ०.१ | १.९ | ८ | १७ | ३.३ | १ | २ | ६ | ४ | २ |
| वर्धा | १९७ | १५ | ३३ | ० | ० | ०.१ | ८.३ | ६ | १२ | २ | २ | ८ | ४ | २ |
| नागपूर | १०९ | ४.९ | १२ | ०.२ | ०.१ | ०.८ | ३.३ | १७ | २० | ३ | ३ | १० | ७ | ४ |
| चंद्रपूर | ३२८ | ९६ | ११ | ०.५ | ०.३ | ३.२ | २.२ | १६ | ३.४ | २ | ४ | २२ | ७ | ७ |

उशीरा पेरणी झालेल्या बोलगार्ड—II कापसामध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रार्दुभाव येऊ शकतो. त्यामुळे यानंतर महाराष्ट्रात कापसाची पेरणी करू नये. राज्यात सर्वत्र १४ जुलैनंतर पावसाचा ओघ कमी होणार आहे. कुळपणी व खुरपणी योग्य पध्दतीने करून घ्यावी. जून मध्ये पेरणी झालेल्या कापसाला जर नत्राची मात्रा सुरूवातीला दिली असेल तर प्रति हेक्टरी १ बॅग याप्रमाणे युरियाची मात्रा जुलै महिन्याच्या शेवटी देण्यात यावी.

अमरावती विभागातील पाच जिल्हयामध्ये १६ जुलै पर्यंत प्रत्येकी २८० ते ३८० मिमी इतक्या पावसाची नोंद आहे. वाशिम जिल्हयात पावसाचे असमान वितरण झाल्यामुळे पेरणीला उशीर झाला आहे. जुलै महिन्यात दुसऱ्या आठवडयात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. १६ जुलैपर्यंत बुलढाणा जिल्हयातील १.७ लाख हेक्टर आणि अकोला जिल्हयातील जवळजवळ १ लाख हेक्टर क्षेत्रातील पेरणी झाली आहे. उमरावती आणि यवतमाळ जिल्हयातील १.७ लाख हेक्टर आणि ३.५ लाख क्षेत्रात पेरणी पूण्र झाली आहे. यावर्षी बीड जिल्हयातील ९० टक्के पेरणी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात पूर्ण झाली आहे. अदयाप या जिल्हयात ९६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या जिल्हयात पावसाचे असमान वितरण आहे परंतु ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात या जिल्हयात चांगल्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. जालना आणि औरंगाबाद जिल्हयात नुकताच चांगला पाऊस झाला आहे. जालना आणि बीड जिल्हयात अनुक्रमे २१८ मिमी आणि २५५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या दोन्ही जिल्हयात पेरणी पूर्ण झाली आहे. या विभागात जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात जवळजवळ १ ते १.५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. नांदेड जिल्हयात १६ जुलैपर्यंत समान वितरणासह ३७८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. परभणी जिल्हयात ३०० मिमी पावसाची नोंद झाली आहे. नांदेड जिल्हयात जवळजवळ सर्वच क्षेत्रात कापसाची पेरणी पूर्ण झाली आहे अहवालानुसार ५० ते ६० टक्के क्षेत्रातील पेरणी पूर्ण झाली असली तरी अदयाप लातूर विभागातील ४ लाख हेक्टर क्षेत्रातील पेरणी पूर्ण झाली नाही. धुळे आणि जळगाव जिल्हयामध्ये जूनच्या शेवटच्या आठवडयात पावसाला सुरूवात झाली. अदयापर्यंत जळगावमध्ये २३९ मिमी आणि धुळे जिल्हयात १६५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात धुळे जिल्हयातील पेरणी पूर्ण झाली आहे. अहमदनगर जिल्हयात पेरणी सावकाश होत आहे. तुडतुडयाला सहज बळी पडणाऱ्या बीटी संकरीत वाणांची लागण उशीरा झाली असेल तर त्यावर तुडतुडयाचे

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | प्रमाण जास्त आढळून येईल. नंदुरबार जिल्हयातील जवळजवळ ५० टक्के पेक्षा जास्त कापसाची पेरणी उशीरा झाली आहे. गुलाबी बोंडअळीचा प्रार्दुभाव फुलोऱ्यावस्थेत ऑगस्टमध्ये येऊ शकतो परंतु ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात या किडीचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. त्यासाठी गुलाबी बोंडअळीच्या पाहणीसाठी ऑगस्टपासून कामगंध सापळयाचा वापर करावा. सर्वत्र सारखे फुले आणि बोंडे लागण्यासाठी जास्त युरियाचा वापर करणे आणि इमिडक्लोप्रीड किंवा थायोमेथोक्झाम किंवा मोनोक्रोटोफॉस चा वापर करणे टाळावा. या किटकनाशकाला तुडतुडयामध्ये प्रतिकार निर्माण झाला आहे आणि जर ती पिकाच्या सुरूवातीला वापरली तर त्यामुळे मित्रकिडे मारले जातील तसेच पिकांचे वाढ उशिरा होईल.<br>१६ जुलैपर्यंत नागपूर मध्ये ३२१ मिमी तर चंद्रपूर जिल्हयात ६२५ मिमी आणि वर्धा जिल्हयात ४४३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जूनच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवडयात ज्या ठिकाणची कोरडी पेरणी झालेली आहे तेथील पिक आरोग्यकारी आहे. अदयाप नागपूर जिल्हयातील फक्त ४३,१६७ हेक्टर क्षेत्रात कापसाची पेरणी झाली आहे. २ जुलैपर्यंत पेरणी झालेले कापसाचे २.०६ लाख क्षेत्रातील पीक चांगल्या अवस्थेत आहे. व त्यानंतर पेरणी झालेले ३.१ लाख हेक्टर क्षेत्राला विशेष लक्ष देण्याची गरज आहे. सर्वसाधारण क्षेत्रापेक्षा नागपूर विभागात कापसाची पेरणी २ पट वाढली आहे. ८–१३ जुलैदरम्यान या विभागात मुसळधार पाऊस झाला. जूनमध्ये पेरणी झालेल्या पिकाला एक खुरपणी व वखरणी दिल्यास त्याची वाढ चांगली होईल. जर नत्राची मात्रा जास्त दिली तर तुडतुडयाचे प्रमाण वाढू लागेल. सध्या कोणत्याही प्रकारच्या किटकनाशकाची फवारणी करू नये. जर युरिया जास्त प्रमाणात टाकला तर तुडतुडयाचे प्रमाण बीटी संकरीत वाणामध्ये वाढेल. नीम तेल १० मिली प्रति लिटर आणि ५ ग्रॅम कपडयाच्या साबणाचा फवारणीसाठी वापर करावा. ज्या ठिकाणी पाण्याचा योग्य निचरा होत नाही त्याठिकाणी मर रोगाचा प्रार्दुभाव येऊ शकतो. त्यासाठी सुरूवातीला जमिनीत कार्बनडेंझीमची ५० टक्के डब्लू पी प्रति ५० ग्रॅम १०० लिटर प्रति हेक्टर पाण्यात मिसळून फवारणी करावी व त्यानंतर २०० ग्रॅम युरिया १० लिटर पाण्यात मिसळून त्याची फवारणी करावी. |

| आख्यायिक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मि.मी. मध्ये) | < ५ | ५-२० | २०-५० | ५०-८० | >८० |
| | | | | | |

संदर्भ:— http://nwp.imd.gov.in/bias/dist_fcst.htm